.. Dasabodh by Samartha Ramadas Swami Chapter 12 ..

॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक १२ ॥

॥ दशक बारावा : विवेकवैराग्य ॥१२॥

समास पहिला : विमळ लक्षण

॥ श्रीराम ॥

आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थविवेका ।
येथें आळस करूं नका । विवेकी हो ॥ १॥
प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल ।
प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी ॥ २॥
प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला ।
मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ॥ ३॥
परमार्थ सांडून प्रपंच करिसी । तरी तूं येमयातना भोगिसी ।
अंतीं परम कष्टी होसी । येमयातना भोगितां ॥ ४॥
साहेबकामास नाहीं गेला । गृहींच सुरवडोन बैसला ।
तरी साहेब कुटील तयाला । पाहाती लोक ॥ ५॥
तेव्हां महत्वचि गेलें । दुर्जनाचें हासें जालें ।
दुःख उदंड भोगिलें । आपुल्या जीवें ॥ ६॥
तैसेचि होणार अंतीं । म्हणोन भजावें भगवंतीं ।
परमार्थाची प्रचिती । रोकडी घ्यावी ॥ ७॥
संसारीं असतां मुक्त । तोचि जाणावा संयुक्त ।
अखंड पाहे युक्तायुक्त । विचारणा हे ॥ ८॥
प्रपंची जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।
प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥ ९॥
म्हणौन सावधपणें । प्रपंच परमार्थ चालवणें ।
ऐसें न करिता भोगणें । नाना दुःखें ॥ १०॥
पर्णाळि पाहोन उचले । जीवसृष्टि विवेकें चाले ।
आणि पुरुष होऊन भ्रमले । यासी काय म्हणावें ॥ ११॥
म्हणौन असावी दीर्घ सूचना । अखंड करावी चाळणा ।
पुढील होणार अनुमाना । आणून सोडावें ॥ १२॥
सुखी असतो खबर्दार । दुःखी होतो बेखबर ।
ऐसा हा लोकिक विचार । दिसतचि आहे ॥ १३॥
म्हणौन सर्वसावधान । धन्य तयाचें महिमान ।
जनीं राखे समाधान । तोचि येक ॥ १४॥
चाळणेचा आळस केला । तरी अवचिता पडेल घाला ।
ते वेळे सावरायाला । अवकाश कैंचा ॥ १५॥
म्हणौन दीर्घसूचनेचे लोक । त्यांचा पाहावा विवेक ।
लोकांकरिता लोक । शाहाणे होती ॥ १६॥
परी ते शाहाणे वोळखावे । गुणवंताचे गुण घ्यावे ।
अवगुण देखोन सांडावे । जनामधें ॥ १७॥
मनुष्य पारखूं राहेना । आणि कोणाचें मन तोडीना ।
मनुष्यमात्र अनुमाना । आणून पाहे ॥ १८॥
दिसे सकळांस सारिखा । पाहातां विवेकी नेटका ।
कामी निकामी लोकां । बरें पाहे ॥ १९॥
जाणोन पाहिजेत सर्व । हेंचि तयाचें अपूर्व ।
ज्याचे त्यापरी गौरव । राखों जाणे ॥ २०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
विमळलक्षणनाम समास पहिला ॥ १॥ १२.१

समास दुसरा : प्रत्ययनिरूपण

॥ श्रीराम ॥

ऐका संसारासी आले हो । स्त्री पुरुष निस्पृह हो ।
सुचितपणें पाहो । अर्थांतर ॥ १॥
काये म्हणते वासना । काये कल्पिते कल्पना ।
अंतरींचे तरंग नाना । प्रकारें उठती ॥ २॥
बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें ।
मनासारिखें असावें । सकळ कांहीं ॥ ३॥
ऐसें आहे मनोगत । तरी तें कांहींच न होत ।
बरें करितां अकस्मात । वाईट होतें ॥ ४॥
येक सुखी येक दुःखी । प्रत्यक्ष वर्ततें लोकीं ।
कष्टी होऊनियां सेखीं । प्रारब्धावरी घालिती ॥ ५॥
अचुक येत्न करवेना । म्हणौन केलें तें सजेना ।
आपला अवगुण जाणवेना । कांहीं केल्यां ॥ ६॥
जो आपला आपण नेणे । तो दुसऱ्याचें काये जाणे ।
न्याये सांडितां दैन्यवाणे । होती लोक ॥ ७॥
लोकांचे मनोगत कळेना । लोकांसारिखें वर्तवेना ।
मूर्खपणें लोकीं नाना । कळह उठती ॥ ८॥
मग ते कळो वाढती । परस्परें कष्टी होती ।
प्रेत्न राहातां अंतीं । श्रमचि होयें ॥ ९॥
ऐसी नव्हे वर्तणुक । परिक्षावे नाना लोक ।
समजलें पाहिजे नेमक । ज्याचें त्यापरी ॥ १०॥
शब्द परीक्षा अंतरपरीक्षा । कांहीं येक कळे दक्षा ।
मनोगत नतद्रक्षा । काय कळे ॥ ११॥
दुसऱ्यास शब्द ठेवणें । आपला कैपक्ष घेणें ।
पाहों जातां लोकिक लक्षणें । बहुतेक ऐसीं ॥ १२॥
लोकीं बरें म्हणायाकारणें । भल्यास लागतें सोसणें ।
न सोसितां भंडवाणें । सहजचि होये ॥ १३॥
आपणास जें मानेना । तेथें कदापि राहावेना ।

उरी तोडून जावेना । कोणीयेकें ॥ १४ ॥
बोलतो खरें चालतो खरें । त्यास मानिती लहानथोरें ।
न्याये अन्याये परस्परें । सहजचि कळे ॥ १५ ॥
लोकांस कळेना तंवरी । विवेकें क्ष्मा जो न करी ।
तेणेंकरितां बराबरी । होत जाते ॥ १६ ॥
जंवरी चंदन झिजेना । तंव तो सुगंध कळेना ।
चंदन आणि वृक्ष नाना । सगट होती ॥ १७ ॥
जंव उत्तम गुण न कळे । तों या जनास काये कळे ।
उत्तम गुण देखतां निवळे । जगदांतर ॥ १८ ॥
जगदांतर निवळत गेलें । जगदांतरी सख्य जालें ।
मग जाणावें वोळले । विश्वजन ॥ १९ ॥
जनींजनार्दन वोळला । तरी काये उणें तयाला ।
राजी राखावें सकळांला । कठीण आहे ॥ २० ॥
पेरिलें तें उगवतें । उसिणें द्यावें घ्यावें लागतें ।
वर्म काढितां भंगतें । परांतर ॥ २१ ॥
लोकीकीं बरेपण केलें । तेणें सौख्य वाढलें ।
उत्तरासारिखें आलें । प्रत्योत्तर ॥ २२ ॥
हें आवघें आपणांपासीं । येथें बोल नाहीं जनासी ।
सिकवावें आपल्या मनासी । क्षणक्षणा ॥ २३ ॥
खळ दुर्जन भेटला । क्षमेचा धीर बुडाला ।
तरी मोनेंचि स्थळत्याग केला । पाहिजे साधकें ॥ २४ ॥
लोक नाना परीक्षा जाणती । अंतरपरीक्षा नेणती ।
तेणें प्राणी करंटे होती । संदेह नाहीं ॥ २५ ॥
आपणास आहे मरण । म्हणौन राखावें बरेंपण ।
कठिण आहे लक्षण । विवेकाचें ॥ २६ ॥
थोर लाहान समान । आपले पारिखे सकळ जन ।
चढतें वाढतें सनेधान । करितां बरें ॥ २७ ॥
बरें करितां बरें होतें । हें तों प्रत्ययास येतें ।
आतां पुढें सांगावें तें । कोणास काये ॥ २८ ॥
हरिकथानिरूपण । बरेपणें राजकारण ।
प्रसंग पाहिल्याविण । सकळ खोटें ॥ २९ ॥
विद्या उदंडचि सिकला । प्रसंगमान चुकतचि गेला ।
तरी मग तये विद्येला । कोण पुसे ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
प्रत्ययनिरूपणनाम समास दुसरा ॥ २ ॥ १२.२

समास तिसरा : भक्तनिरूपण

॥ श्रीराम ॥

पृथ्वीमधें बहुत लोक । तेंहि पाहावा विवेक ।
इहलोक आणि परलोक । बरा पाहावा ॥ १ ॥
इहलोक साधायाकारणें । जाणत्याची संगती धरणें ।
परलोक साधायाकारणें । सद्गुरु पाहिजे ॥ २ ॥
सद्गुरुसी काये पुसावें । हेंहि कळेना स्वभावें ।
अनन्यभावें येकभावें । दोनी गोष्टी पुसाव्या ॥ ३ ॥
दोनी गोष्टी त्या कोण । देव कोण आपण कोण ।
या गोष्टींचे विवरण । केलेंचि करावें ॥ ४ ॥
आधीं मुख्य देव तो कोण । मग आपण भक्त तो कोण ।
पंचीकर्ण माहावाक्यविवरण । केलेंचि करावें ॥ ५ ॥
सकळ केलियाचें फळ । शाश्वत वोळखावें निश्चळ ।
आपण कोण का केवळ । शोध घ्यावा ॥ ६ ॥
सारासार विचार घेतां । पदास नाहीं शाश्वतता ।
आधी कारण भगवंता । वोळखिलें पाहिजे ॥ ७ ॥
निश्चळ चंचळ आणि जड । अवघा मायेचा पवाड ।
यामधें वस्तु जाड । जाणार नाहीं ॥ ८ ॥
तें परब्रह्म धुंडावें । विवेकें त्रैलोक्य हिंडावें ।
माईक विचार खंडावें । परीक्षवंतीं ॥ ९ ॥
खोटें सांडून खरें घ्यावें । परीक्षवंतीं परीक्षावें ।
मायेचें अवघेचि जाणावें । रूप माईक ॥ १० ॥
पंचभूतिक हे माया । माईक जाये विलया ।
पिंडब्रह्मांड अष्टकाया । नासिवंत ॥ ११ ॥
दिसेल तितुकें नासेल । उपजेल तितुकें मरेल ।
रचेल तितुकें खचेल । रूप मायेचें ॥ १२ ॥
वाढेल तितुकें मोडेल । येईल तितुलें जाईल ।
भूतांस भूत खाईल । कल्पांतकाळीं ॥ १३ ॥
देहधारक तितुके नासती । हे तों रोकडी प्रचिती ।
मनुष्येंविण उत्पत्ति । रेत कैंचें ॥ १४ ॥
अन्न नस्तां रेत कैंचें । वोषधी नस्तां अन्न कैंचें ।
वोषधीस जिणें कैंचें । पृथ्वी नस्तां ॥ १५ ॥
आप नस्तां पृथ्वी नाहीं । तेज नस्तां आप नाहीं ।
वायो नस्तां तेज नाहीं । ऐसें जाणावें ॥ १६ ॥
अंतरात्मा नस्तां वायो कैंचा । विकार नस्तां अंतरात्मा कैंचा ।
निर्विकारीं विकार कैंचा । बरें पाहा ॥ १७ ॥
पृथ्वी नाहीं आप नाहीं । तेज नाहीं वायो नाहीं ।
अंतरात्मा विकार नाहीं । निर्विकारीं ॥ १८ ॥
निर्विकार जें निर्गुण । तेचि शाश्वताची खूण ।
अष्टधा प्रकृति संपूर्ण । नासिवंत ॥ १९ ॥
नासिवंत समजोन पाहिलें । तों तें अस्तांचि नस्तें जालें ।
सारासारें कळों आलें । समाधान ॥ २० ॥
विवेकें पाहिला विचार । मनास आलें सारासार ।
येणेंकरितां विचार । सदृढ जाला ॥ २१ ॥
शाश्वत देव तो निर्गुण । ऐसीं अंतरीं बाणली खूण ।
देव कळला मी कोण । कळलें पाहिजे ॥ २२ ॥
मी कोण पाहिजे कळलें । देहतत्व तितुकें शोधिलें ।
मनोवृत्तीचा ठाईं आलें । मीतूंपण ॥ २३ ॥
सकळ देहाचा शोध घेतां । मीपण दिसेना पाहातां ।
मीतूंपण हें तत्वता । तत्वीं मावळलें ॥ २४ ॥
दृश्य पदार्थचि वोसरे । तत्वें तत्व तेव्हां सरे ।

मीतूंपण हें कैंचें उरे । तत्वता वस्तु ॥ २५ ॥
पंचीकर्ण तत्वविवर्ण । माहावाक्यें वस्तु आपण ।
निसंगपणें निवेदन । केले पाहिजे ॥ २६ ॥
देवाभक्तांचे मूळ । शोधून पाहातां सकळ ।
उपाधिवेगला केवळ । निरोपाधी आत्मा ॥ २७ ॥
मीपण तें बुडालें । विवेकें वेगळेपण गेलें ।
निवृत्तिपदास प्राप्त जालें । उन्मनीपद ॥ २८ ॥
विज्ञानीं राहिलें ज्ञान । ध्येये राहिलें ध्यान ।
सकळ कांहीं कार्याकारण । पाहोन सांडिलें ॥ २९ ॥
जन्ममरणाचें चुकलें । पाप अवघेंचि बुडालें ।
येमयातनेचें जालें । निसंतान ॥ ३० ॥
निबंद अवघाचि तुटला । विचारें मोक्ष प्राप्त जाला ।
जन्म सार्थकचि वाटला । सकळ कांहीं ॥ ३१ ॥
नाना किंत निवारले । धोके अवघेचि तुटले ।
ज्ञानविवेकें पावन जालें । बहुत लोक ॥ ३२ ॥
पतितपावनाचे दास । तेहि पावन करिती जगास ।
ऐसी हे प्रचित मनास । बहुतांच्या आली ॥ ३३ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
भक्तनिरूपणनाम समास तिसरा ॥ ३ ॥ १२.३

समास चौथा : विवेकवैराग्यनिरूपण

॥ श्रीराम ॥

महद्भाग्य हातासी आलें । परी भोगूं नाहीं जाणितलें ।
तैसें वैराग्य उत्पन्न जालें । परी विवेक नाहीं ॥ १ ॥
आदळतें आफळतें । कष्टी होतें दुःखी होतें ।
ऐकतें देखते येतें । वैराग्य तेणें ॥ २ ॥
नाना प्रपंचाच्या वोढी । नाना संकटें सांकडीं ।
संसार सांडुनी देशधडी । होये तेणें ॥ ३ ॥
तो चिंतेपासून सुटला । पराधेनतेपासुनि पळाला ।
दुःखत्यागें मोकळा जाला । रोगी जैसा ॥ ४ ॥
परी तो होऊं नये मोकाट । नष्ट भ्रष्ट आणि चाट ।
सीमाच नाहीं सैराट । गुरूं जैसें ॥ ५ ॥
विवेकेंविण वैराग्ये केलें । तरी अविवेकें अनर्थीं घातलें ।
अवघें वेर्थचि गेलें । दोहिंकडे ॥ ६ ॥
ना प्रपंच ना परमार्थ । अवघें जिणेंचि जालें वेर्थ ।
अविवेकें अनर्थ । ऐसा केला ॥ ७ ॥
कां वेर्थचि ज्ञान बडबडिला । परी वैराग्ययोग नाहीं घडला ।
जैसा कारागृहीं अडकला । पुरुषार्थ सांगे ॥ ८ ॥
वैराग्येंविण ज्ञान । तो वेर्थचि साभिमान ।
लोभदंभें घोळसून । कासाविस केला ॥ ९ ॥
स्वान बांधलें तरी भुंके । तैसा स्वार्थमुळें थिंकें ।
पराधीक देखों न सके । साभिमानें ॥ १० ॥
हें येकेंविण येक । तेणें उगाच वाढे शोक ।
आतां वैराग्य आणि विवेक । योग ऐका ॥ ११ ॥
विवेकें अंतरीं सुटला । वैराग्यें प्रपंच तुटला ।
अंतर्बाह्य मोकळा जाला । निःसंग योगी ॥ १२ ॥
जैसें मुखें ज्ञान बोले । तैसीच सवें क्रिया चाले ।
दीक्षा देखोनी चक्कित जाले । सुचिस्मंत ॥ १३ ॥
आस्था नाहीं त्रिलोक्याची । स्थिती बाणली वैराग्याची ।
येत्नविवेकधारणेची । सीमा नाहीं ॥ १४ ॥
संगीत रसाळ हरिकीर्तन । तालबद्ध तानमान ।
प्रेमळ आवडीचें भजन । अंतरापासुनी ॥ १५ ॥
तत्काळचि सन्मार्ग लागे । ऐसा अंतरीं विवेक जागे ।
वगत्रृत्व करितां न भंगे । साहित्य प्रत्ययाचें ॥ १६ ॥
सन्मार्गें जगास मिळाला । म्हणिजे जगदीश वोळला ।
प्रसंग पाहिजे कळला । कोणीयेक ॥ १७ ॥
प्रखर वैराग्य उदासीन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान ।
स्नानसंध्या भगवद्भजन । पुण्यमार्ग ॥ १८ ॥
विवेकवैराग्य तें ऐसें । नुस्तें वैराग्य हेंकाडपिसें ।
शब्दज्ञान येळिलसें । आपणचि वाटे ॥ १९ ॥
म्हणौन विवेक आणि वैराग्य । तेंचि जाणिजे महद्भाग्य ।
रामदास म्हणे योग्य । साधु जाणती ॥ २० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
विवेकवैराग्यनिरूपणनाम समास चौथा ॥ ४ ॥ १२.४

समास पांचवा : आत्मनिवेदन

॥ श्रीराम ॥

रेखेचें गुंडाळें केलें । मात्रुकाक्षरीं शब्द जाले ।
शब्द मेळऊन चाले । श्लोक गद्य प्रबंद ॥ १ ॥
वेदशास्त्रें पुराणें । नाना काव्यें निरूपणें ।
ग्रंथभेद अनुवादणें । किती म्हणोनि ॥ २ ॥
नाना ऋषी नाना मतें । पाहों जातां असंख्यातें ।
भाषा लिपी जेथ तेथें । काये उणें ॥ ३ ॥
वर्ग ऋचा श्रुति स्मृति । अधे स्वर्ग स्तबक जाती ।
प्रसंग मानें समास पोथी । बहुधा नामें ॥ ४ ॥
नाना पदें नाना श्लोक । नाना बीर नाना कडक ।
नाना साख्या दोहडे अनेक । नामाभिधानें ॥ ५ ॥
डफगाणें माचिगाणें । दंडिगाणें कथागाणें ।
नाना मानें नाना जसनें । नाना खेळ ॥ ६ ॥
ध्वनि घोष नाद रेखा । चहुं वाचामध्यें देखा ।
वाचारूपेंहि ऐका । नाना भेद ॥ ७ ॥
उन्मेष परा ध्वनि पश्यंति । नाद मध्यमा शब्द चौथी ।
वैखरीपासून उमटती । नाना शब्दरत्नें ॥ ८ ॥
अकार उकार मकार । अर्धमात्राचें अंतर ।
औटमात्रा तदनंतर । बावन मात्रुका ॥ ९ ॥
नाना भेद रागज्ञान । नृत्यभेद तानमान ।
अर्थभेद तत्वज्ञान । विवंचना ॥ १० ॥
तत्वांमध्यें मुख्य तत्व । तें जाणावें शुद्धसत्व ।

अर्धमात्रा महत्तत्व । मूळमाया ॥ ११ ॥
नाना तत्वें लाहानथोरे । मिळोन अष्टहि शरीरें ।
अष्टधा प्रकृतीचें वारें । निघोन जातें ॥ १२ ॥
वारें नस्तां जें गगन । तैसें परब्रह्म सघन ।
अष्ट देहाचें निर्शन । करून पाहावें ॥ १३ ॥
ब्रह्मांडपिंडउभार । पिंडब्रह्मांडसंव्हार ।
दोहिवेगळें सारासार । विमळब्रह्म ॥ १४ ॥
पदार्थ जड आत्मा चंचळ । विमळब्रह्म तें निश्चळ ।
विवरोन विरे तत्काळ । तद्रूप होये ॥ १५ ॥
पदार्थ मनें काया वाचा । मी हा अवघाचि देवाचा ।
जड आत्मनिवेदनाचा । विचार ऐसा ॥ १६ ॥
चंचळकर्ता तो जगदीश । प्राणीमात्र तो त्याचा अंश ।
त्याचा तोचि आपणास । ठाव नाहीं ॥ १७ ॥
चंचळ आत्मनिवेदन । याचें सांगितलें लक्षण ।
कर्ता देव तो आपण । कोठेंचि नाहीं ॥ १८ ॥
चंचळ चळे स्वप्नाकार । निश्चळ देव तो निराकार ।
आत्मनिवेदनाचा प्रकार । जाणिजे ऐसा ॥ १९ ॥
ठावचि नाहीं चंचळाचा । तेथें आधीं आपण कैंचा ।
निश्चळ आत्मनिवेदनाचा । विवेक ऐसा ॥ २० ॥
तिहिं प्रकारें आपण । नाहीं नाहीं दुजेपण ।
आपण नस्तां मीपण । नाहींच कोठें ॥ २१ ॥
पाहातां पाहातां अनुमानलें । कळतां कळतां कळों आलें ।
पाहातां अवघेंचि निवांत जालें । बोलणें आतां ॥ २२ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
आत्मनिवेदननाम समास पांचवा ॥ ५ ॥ १२.५

समास सहावा : सृष्टिक्रमनिरूपण

॥ श्रीराम ॥

ब्रह्म निर्मळ निश्चळ । शाश्वत सार अमळ विमळ ।
अवकाश घन पोकळ । गगनाऐसें ॥ १ ॥
तयास करणें ना धरणें । तयास जन्म ना मरणें ।
तेथें जाणणें ना नेणणें । सुन्यातीत ॥ २ ॥
तें रचेना ना खचेना । तें होयेना ना जायेना ।
मायातीत निरंजना । पारचि नाहीं ॥ ३ ॥
पुढें संकल्प उठिला । षडगुणेश्वर बोलिजे त्याला ।
अर्धनारी नटेश्वराला । बोलिजेतें ॥ ४ ॥
सर्वेश्वर सर्वज्ञ । साक्षी द्रष्टा ज्ञानघन ।
परेश परमात्मा जगजीवन । मूळपुरुष ॥ ५ ॥
ते मूळमाया बहुगुणी । अधोमुखें गुणक्षोभिणी ।
गुणत्रये तिजपासूनि । निर्माण जाले ॥ ६ ॥
पुढें विष्णु जाला निर्माण । जाणतीकळा सत्त्वगुण ।
जो करिताहे पाळण । त्रैलोक्याचें ॥ ७ ॥
पुढें जाणीवनेणीवमिश्रित । ब्रह्मा जाणावा नेमस्त ।
त्याच्या गुणें उत्पत्ति होत । भुवनत्रैं ॥ ८ ॥
पुढें रुद्र तमोगुण । सकळ संव्हाराचें कारण ।
सकळ कांहीं कर्तेपण । तेथेंचि आलें ॥ ९ ॥
तेथून पुढें पंचभूतें । पावलीं पष्ट दशेतें ।
अष्टधा प्रकृतीचें स्वरूप तें । मुळींच आहे ॥ १० ॥
निश्चळीं जालें चळण । तेंचि वायोचें लक्षण ।
पंचभूतें आणि त्रिगुण । सूक्ष्म अष्टधा ॥ ११ ॥
आकाश म्हणिजे अंतरात्मा । प्रत्ययें पाहावा महिमा ।
त्या आकाशापासून जन्मा । वायो आला ॥ १२ ॥
तया वायोच्या दोनी झुळुका । उष्ण सीतळ ऐका ।
सीतळापासून तारा मयंका । जन्म जाला ॥ १३ ॥
उष्णापासून रवि वन्ही । विद्युल्यता आदिकरूनि ।
सीतळ उष्ण मिळोनि । तेज जाणावें ॥ १४ ॥
तया तेजापासून जालें आप । आप आळोन पृथ्वीचें रूप ।
पुढें औषधी अमूप । निर्माण जाल्यां ॥ १५ ॥
औषधीपासून नाना रस । नाना बीज अन्नरस ।
चौऱ्यासि लक्ष योनीच वास । भूमंडळीं ॥ १६ ॥
ऐसी जाली सृष्टीरचना । विचार आणिला पाहिजे मना ।
प्रत्ययेंविण अनुमाना । पात्र होईजे ॥ १७ ॥
ऐसा जाला आकार । येणेंचि न्यायें संव्हार ।
सारासारविचार । यास बोलिजे ॥ १८ ॥
जें जें जेथून निर्माण जालें । तें तें तेथेंचि निमालें ।
येणेंचि न्यायें संव्हारलें । माहाप्रळई ॥ १९ ॥
आद्य मध्य अवसान । जें शाश्वत निरंजन ।
तेथें लावावें अनुसंधान । जाणते पुरुषीं ॥ २० ॥
होत जाते नाना रचना । परी ते कांहींच तगेना ।
सारासार विचारणा । याकारणें ॥ २१ ॥
द्रष्टा साक्षी अंतरात्मा । सर्वत्र बोलती महिमा ।
परी हे सर्वसाक्षिणी अवस्ता मां । प्रत्ययें पाहावी ॥ २२ ॥
मुळापासून सेवटवरी । अवघी मायेची भरोवरी ।
नाना विद्या कळाकुसरी । तयेमधें ॥ २३ ॥
जो उपाधीचा सेवट पावेल । त्यास भ्रम ऐसें वाटेल ।
जो उपाधीमध्यें आडकेल । त्यास काढिता कवण ॥ २४ ॥
विवेक प्रत्ययाचीं कामें । कैसीं घडतील अनुमानभ्रमें ।
सारासारविचाराचेन संभ्रमें । पाविजे ब्रह्म ॥ २५ ॥
ब्रह्मांडींचे माहाकारण । ते मुळमाया जाण ।
अपूर्णास म्हणती ब्रह्म पूर्ण । विवेकहीन ॥ २६ ॥
सृष्टीमधें बहुजन । येक भोगिती नृपासन ।
येक विष्ठा टाकिती जाण । प्रत्येक्ष आतां ॥ २७ ॥
ऐसे उदंड लोक असती । आपणास थोर म्हणती ।
परी ते विवेकी जाणती । सकळ कांहीं ॥ २८ ॥
ऐसा आहे समाचार । कारण पाहिजे विचार ।
बहुतांच्या बोलें हा संसार । नासूं नये ॥ २९ ॥
पुस्तकज्ञानें निश्चये धरणें । तरी गुरु कासया करणें ।

याकारणें विवरणें । आपुल्या प्रत्ययें ॥ ३० ॥
जो बहुतांच्या बोलें लागला । तो नेमस्त जाणावा बुडाला ।
येक साहेब नस्तां कोणाला । मुश्यारा मगावा ॥ ३१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सृष्टिक्रमनिरूपणनाम समास सहावा ॥ ६ ॥ १२.६

समास सातवा : विषयत्याग

॥ श्रीराम ॥

न्यायें निष्ठुर बोलणें । बहुतांस वाटे कंटाळवाणें ।
मळमळ करितां जेवणें । विहित नव्हे ॥ १ ॥
बहुतीं विषय निंदिले । आणि तेचि सेवित गेले ।
विषयत्यागें देह चाले । हें तों घडेना ॥ २ ॥
बोलणें येक चालणें येक । त्याचें नांव हीन विवेक ।
येणें करितां सकळ लोक । हांसों लागती ॥ ३ ॥
विषयत्यागेंविण तों कांहीं । परलोक तो प्राप्त नाहीं ।
ऐसें बोलणें ठाई ठाई । बरें पाहा ॥ ४ ॥
प्रपंची खाती जेविती । परमार्थी काये उपवास करिती ।
उभयता सारिखे दिसती । विषयाविषई ॥ ५ ॥
देह चालतां विषय त्यागी । ऐसा कोण आहे जगीं ।
याचा निर्वाह मजलागीं । देवें निरोपावा ॥ ६ ॥
विषय अवघा त्यागावा । तरीच परमार्थ करावा ।
ऐसें पाहातां गोवा । दिसतो किं ॥ ७ ॥
ऐसा श्रोता अनुवादला । वक्ता उत्तर देता जाला ।
सावध होऊन मन घाला । येतद्विषई ॥ ८ ॥
वैराग्यें करावा त्याग । तरीच परमार्थयोग ।
प्रपंचत्यागें सर्व सांग । परमार्थ घडे ॥ ९ ॥
मागें ज्ञानी होऊन गेले । तेंहिं बहुत कष्ट केले ।
तरी मग विख्यात जाले । भूमंडळीं ॥ १० ॥
येर मत्सर करितांच गेलीं । अन्न अन्न म्हणतां मेलीं ।
कित्येक भ्रष्टलीं । पोटासाठीं ॥ ११ ॥
वैराग्य मुळींहून नाहीं । ज्ञान प्रत्ययाचें नाहीं ।
सुचि आचार तोहि नाहीं । भजन कैंचें ॥ १२ ॥
ऐसे प्रकारीचे जन । आपणास म्हणती सज्जन ।
पाहों जातां अनुमान । अवघाच दिसे ॥ १३ ॥
जयास नाहीं अनुताप । हेंचि येक पूर्वपाप ।
क्षणक्षणा विक्षेप । पराधीकपणें ॥ १४ ॥
मज नाहीं तुज साजेना । हें तों अवघें ठाउकें आहे जना ।
खात्यास नखातें देखों सकेना । ऐसें आहे ॥ १५ ॥
भाग्यपुरुष थोर थोर । त्यास निंदिती डीवाळखोर ।
सावास देखतां चोर । चर्फडी जैसा ॥ १६ ॥
वैराग्यपरतें नाहीं भाग्य । वैराग्य नाहीं तें अभाग्य ।
वैराग्य नस्तां योग्य । परमार्थ नव्हे ॥ १७ ॥
प्रत्ययेज्ञानी वीतरागी । विवेकबळें सकळ त्यागी ।
तो जाणीजे माहांयोगी । ईश्वरी पुरुष ॥ १८ ॥
अष्टमा सिद्धीची उपेक्षा । करून घेतली योगदीक्षा ।
घरोघरीं मागे भिक्षा । माहादेव ॥ १९ ॥
ईश्वराची बराबरी । कैसा करील वेषधारी ।
म्हणोनियां सगट सरी । होत नाहीं ॥ २० ॥
उदास आणि विवेक । त्यास शोधिती सकळ लोक ।
जैसें लालची मूर्ख रंक । तें दैन्यवाणें ॥ २१ ॥
जे विचारापासून चेवले । जे आचारापासून भ्रष्टले ।
विवेक करूं विसरले । विषयलोभीं ॥ २२ ॥
भजन तरी आवडेना । पुरश्चर्ण कदापि घडेना ।
भल्यांस त्यांस पडेना । येतन्निमित्य ॥ २३ ॥
वैराग्यें करून भ्रष्टेना । ज्ञान भजन सांडिना ।
वित्पन्न आणि वाद घेना । ऐसा थोडा ॥ २४ ॥
कष्ट करितां सेत पिके । उंच वस्त तत्काळ विके ।
जाणत्या लोकांच्या कौतुकें । उड्या पडती ॥ २५ ॥
येर ते अवघेचि मंदले । दुराशेनें खोटे जाले ।
कानकोंडें ज्ञान केलें । भ्रष्टाकारें ॥ २६ ॥
सबळ विषय त्यागणें । शुद्ध कार्याकारण घेणें ।
विषयत्यागाचीं लक्षणें । वोळखा ऐसीं ॥ २७ ॥
सकळ कांहीं कर्ता देव । नाहीं प्रकृतीचा ठाव ।
विवेकाचा अभिप्राव । विवेकी जाणती ॥ २८ ॥
शूरत्वविषई खडतर । त्यास मानिती लाहानथोर ।
कामगार आणि आंगचोर । येक कैसा ॥ २९ ॥
त्यागात्याग तार्किक जाणे । बोलाऐसें चालों जाणे ।
पिंडब्रह्मांड सकळ जाणे । येथायोग्य ॥ ३० ॥
ऐसा जो सर्वजाणता । उत्तमलक्षणी पुरुता ।
तयाचेनि सार्थकता । सहजचि होये ॥ ३१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
विषयत्यागनिरूपणनाम समास सातवा ॥ ७ ॥ १२.७

समास आठवा : काळरूपनिरूपण

॥ श्रीराम ॥

मूळमाया जगदेश्वर । पुढें अष्टधेचा विस्तार ।
सृष्टिक्रमें आकार । आकारला ॥ १ ॥
हें अवघेंच नस्तां निर्मळ । जैसें गगन अंतराळ ।
निराकारीं काळवेळ । कांहींच नाहीं ॥ २ ॥
उपाधीचा विस्तार जाला । तेथें काळ दिसोन आला ।
येरवीं पाहातां काळाला । ठावचि नाही ॥ ३ ॥
येक चंचळ येक निश्चल । यावेगळा कोठें काळ ।
चंचळ आहे तावत्काळ । काळ म्हणावें ॥ ४ ॥
आकाश म्हणिजे अवकाश । अवकाश बोलिजे विलंबास ।
त्या विलंबरूप काळास । जाणोनि घ्यावें ॥ ५ ॥
सूर्याकरितां विलंब कळे । गणना सकळांची आकळे ।
पळापासून निवळे । युगपरियंत ॥ ६ ॥
पळ घटिका प्रहर दिवस । अहोरात्र पक्ष मास ।

शङ्खास वरि युगास । ठाव जाला ॥ ७॥
कृत त्रेत द्वापार कळी । संख्या चालिली भूमंडळी ।
देवांचीं आयुष्यें आगळीं । शास्त्रीं निरोपिलीं ॥ ८॥
ते देवत्रयाची खटपट । सूक्ष्मरूपें विलगट ।
दंडक सांडितां चटपट । लोकांस होते ॥ ९॥
मिश्रित त्रिगुण निवडेना । तेणें आद्यंत सृष्टिरचना ।
कोण थोर कोण साना । कैसा म्हणावा ॥ १०॥
असो हीं जाणत्याचीं कामें । नेणता उगाच गुंते भ्रमें ।
प्रत्यये जाणजाणों वर्मे । ठाई पाडावीं ॥ ११॥
उत्पन्नकाळ सृष्टिकाळ । स्थितिकाळ संव्हारकाळ ।
आद्यंत अवघा काळ । विलंबरूपी ॥ १२॥
जें जें जये प्रसंगीं जालें । तेथें काळाचें नांव पडिलें ।
बरें नसेल अनुमानलें । तरी पुढें ऐका ॥ १३॥
प्रजन्यकाळ शीतकाळ । उष्णकाळ संतोषकाळ ।
सुखदुःखआनंदकाळ । प्रत्यये येतो ॥ १४॥
प्रातःकाळ माध्यानकाळ । सायंकाळ वसंतकाळ ।
पर्वकाळ कठिणकाळ । जाणिजे लोकीं ॥ १५॥
जन्मकाळ बाळत्वकाळ । तारुण्यकाळ वृधाप्यकाळ ।
अंतकाळ विषमकाळ । वेळरूपें ॥ १६॥
सुकाळ आणि दुष्काळ । प्रदोषकाळ पुण्यकाळ ।
सकळ वेळा मिळोन काळ । तयास म्हणावें ॥ १७॥
असतें येक वाटतें येक । त्याचें नांव हीन विवेक ।
नाना प्रवृत्तीचे लोक । प्रवृत्ति जाणती ॥ १८॥
प्रवृत्ति चाले अधोमुखें । निवृत्ति धावे ऊर्धमुखें ।
ऊर्धमुखें नाना सुखें । विवेकी जाणती ॥ १९॥
ब्रह्मांडरचना जेथून जाली । तेथें विवेकी दृष्टि घाली ।
विवरतां विवरतां लाधली । पूर्वापर स्थिति ॥ २०॥
प्रपंची असोन परमार्थ पाहे । तोहि ये स्थितीतें लाहे ।
प्रारब्धयोगें करून राहे । लोकांमधें ॥ २१॥
सकळांचे येकचि मूळ । येक जाणते येक बाष्कळ ।
विवेकें करून तत्काळ । परलोक साधावा ॥ २२॥
तरीच जन्माचें सार्थक । भले पाहाती उभये लोक ।
कारण मुळींचा विवेक । पाहिला पाहिजे ॥ २३॥
विवेकहीन जे जन । ते जाणावे पशुसमान ।
त्यांचे ऐकतां भाषण । परलोक कैंचा ॥ २४॥
बरें आमचें काये गेलें । जें केलें तें फळास आलें ।
पेरिलें तें उगवलें । भोगिती आतां ॥ २५॥
पुढेंहि करी तो पावे । भक्तियोगें भगवंत फावे ।
देव भक्त मिळतां दुणावें । समाधान ॥ २६॥
कीर्ति करून नाहीं मेले । उगेच आले आणि गेले ।
शाहाणे होऊन भुलले । काये सांगवें ॥ २७॥
येथील येथें अवघेंचि राहातें । ऐसें प्रत्ययास हेतें ।
कोण काये घेऊन जातें । सांगाना कां ॥ २८॥
पदार्थीं असावें उदास । विवेक पाहावा सावकास ।
येणेंकरितां जगदीश । अलभ्य लाभे ॥ २९॥
जगदीशापरता लाभ नाहीं । कार्याकारण सर्व कांहीं ।
संसार करित असतांहि । समाधान ॥ ३०॥
मागां होते जनकादिक । राज्य करितांहि अनेक ।
तैसेचि आतां पुण्यश्लोक । कित्येक असती ॥ ३१॥
राजा असतां मृत्यु आला । लक्ष कोटी कबुल जाला ।
तरि सोडिना तयाला । मृत्य कांहीं ॥ ३२॥
ऐसें हें पराधेन जिणें । यामधें दुखणें बाहाणें ।
नाना उद्वेग चिंता करणें । किती म्हणोनि ॥ ३३॥
हाट भरला संसाराचा । नफा पाहावा देवाचा ।
तरीच या कष्टाचा । परियाये होतो ॥ ३४॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
काळरूपनिरूपणनाम समास आठवा ॥ ८॥ १२.८

समास नववा : यत्नशिकवण

॥ श्रीराम ॥

दुर्बल नाचारी वोडगस्त । आळसी खादाड रिणगस्त ।
मूर्खपणें अवघें वेस्त । कांहींच नाहीं ॥ १॥
खाया नाहीं जेवाया नाहीं । लेया नाहीं नेसाया नाहीं ।
अंथराया नाहीं पांघराया नाहीं । कोंपट नाहीं अभागी ॥ २॥
सोयेरे नाहीं धायेरे नाहीं । इष्ट नाहीं मित्र नाहीं ।
पाहातां कोठें वोळखी नाहीं । आश्रयेंविण परदेसी ॥ ३॥
तेणें कैसें करावें । काये जीवेंसीं धरावें ।
वाचावें किं मरावें । कोण्या प्रकारें ॥ ४॥
ऐसें कोणीयेकें पुसिलें । कोणीयेकें उत्तर दिधलें ।
श्रोतीं सावध ऐकिलें । पाहिजे आतां ॥ ५॥
लाहान थोर काम कांहीं । केल्यावेगळें होत नाहीं ।
करंट्या सावध पाहीं । सदेव होसी ॥ ६॥
अंतरीं नाहीं सावधानता । येत्न ठाकेना पुरता ।
सुखसंतोषाची वार्ता । तेथें कैंची ॥ ७॥
म्हणोन आळस सोडावा । येत्न साक्षेपें जोडावा ।
दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळें ॥ ८॥
प्रातःकाळीं उठत जावें । प्रातःस्मरामि करावें ।
नित्य नेमें स्मरावें । पाठांतर ॥ ९॥
मागील उजळणी पुढें पाठ । नेम धरावा निकट ।
बाष्कळपणाची वटवट । करूंच नये ॥ १०॥
दिशेकडे दुरी जावें । सुचिस्मंत होऊन यावें ।
येतां कांहीं तरी आणावें । रितें खोटें ॥ ११॥
धूतवस्त्रें घालावीं पिळून । करावें चरणक्षाळण ।
देवदर्शन देवार्चन । येथासांग ॥ १२॥
कांहीं फळाहार घ्यावा । पुढें वेवसाये करावा ।
लोक आपला परावा । म्हणत जावा ॥ १३॥
सुंदर अक्षर ल्याहावें । पष्ट नेमस्त वाचावें ।

विवरविवरों जाणावें । अर्थांतर ॥ १४ ॥
नेमस्त नेटकें पुसावें । विशद करून सांगावें ।
प्रत्ययेंविण बोलावें । तेंचि पाप ॥ १५ ॥
सावधानता असावी । नीतिमर्याद राखावी ।
जनास माने ऐसी करावी । क्रियासिद्धि ॥ १६ ॥
आलियाचें समाधान । हरिकथा निरूपण ।
सर्वदा प्रसंग पाहोन । वर्तत जावें ॥ १७ ॥
ताळ धाटी मुद्रा शुद्ध । अर्थ प्रमये अन्वये शुद्ध ।
गद्यपद्यें दृष्टांत शुद्ध । अन्वयाचे ॥ १८ ॥
गाणें वाजवणें नाचणें । हस्तन्यास दाखवणें ।
सभारंजकें वचनें । आडकथा छंदबंद ॥ १९ ॥
बहुतांचें समाधान राखावें । बहुतांस मानेल तें बोलावें ।
विलग पडों नेदावें । कथेमधें ॥ २० ॥
लोकांस उदंड वाजी आणूं नये । लोकांचे उकलावें हृदये ।
तरी मग स्वभावें होये । नामघोष ॥ २१ ॥
भक्ति ज्ञान वैराग्य योग । नाना साधनाचे प्रयोग ।
जेणें तुटे भवरोग । मननमात्रें ॥ २२ ॥
जैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें ।
मग महंतलीळा स्वभावें । आंगीं बाणे ॥ २३ ॥
युक्तिवीण साजिरा योग । तो दुराशेचा रोग ।
संगतीच्या लोकांचा भोग । उभा ठेला ॥ २४ ॥
ऐसें न करावें सर्वथा । जनास पावऊं नये वेथा ।
हृदई चिंतावें समर्थ । रघुनाथजीसी ॥ २५ ॥
उदासवृत्तिस मानवे जन । विशेष कथानिरूपण ।
रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी ॥ २६ ॥
सांग महंती संगीत गाणें । तेथें वैभवास काय उणें ।
नभामाजी तारांगणें । तैसे लोक ॥ २७ ॥
आकलबंद नाहीं जेथें । अवघेंचि विश्कळित तेथें ।
येकें आकलेविण तें । काये आहे ॥ २८ ॥
घालून अकलेचा पवाड । व्हावें ब्रह्मांडाहून जाड ।
तेथें कैचें आणिले द्वाड । करंटपण ॥ २९ ॥
येथें आशंका फिटली । बुद्धि येत्नीं प्रवेशली ।
कांहींयेक आशा वाढली । अंतःकर्णी ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
यत्नशिकवणनाम समास नववा ॥ ९ ॥ १२.९

समास दहावा : उत्तमपुरुषनिरूपण
॥ श्रीराम ॥
आपण येथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वाटणें ।
परंतु वाया दवडणें । हा धर्म नव्हे ॥ १ ॥
तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनास सांगावें ।
तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी ॥ २ ॥
उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे ।
वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ॥ ३ ॥
स्नान संध्या देवार्चन । येकाग्र करावें जपध्यान ।
हरिकथा निरूपण । केलें पाहिजे ॥ ४ ॥
शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास यावें ।
उणें पडों नेदावें । कोणियेकाचें ॥ ५ ॥
आडले जाकसलें जाणावें । यथानशक्ति कामास यावें ।
मृदवचनें बोलत जावें । कोणीयेकासी ॥ ६ ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुःखवावें । परसंतोषें सुखी व्हावें ।
प्राणीमात्रास मेळऊन घ्यावें । बऱ्या शब्दें ॥ ७ ॥
बहुतांचे अन्याये क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे ।
आपल्यापरीस व्हावे । पारखे जन ॥ ८ ॥
दुसऱ्याचें अंतरजाणावें । तदनुसारचि वर्तावें ।
लोकांस परीक्षित जावें । नाना प्रकारें ॥ ९ ॥
नेमकचि बोलावें । तत्काळचि प्रतिवचन द्यावें ।
कदापी रागास न यावें । क्षमारूपें ॥ १० ॥
आलस्य अवघाच दवडावा । येत्न उदंडचि करावा ।
शब्दमत्सर न करावा । कोणीयेकाचा ॥ ११ ॥
उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा ।
सावधपणें करीत जावा । संसार आपला ॥ १२ ॥
मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीस सादर व्हावें ।
मरोन कीर्तीस उरवावें । येणें प्रकारें ॥ १३ ॥
नेमकपणें वर्तों लागला । तो बहुतांस कळों आला ।
सर्व आर्जवी तयाला । काये उणें ॥ १४ ॥
ऐसा उत्तम गुणी विशेष । तयास म्हणावें पुरुष ।
जयाच्या भजनें जगदीश । तृप्त होये ॥ १५ ॥
उदंड धिःकारून बोलती । तरी चळों नेदावी शांति ।
दुर्जनास मिळोन जाती । धन्य ते साधु ॥ १६ ॥
उत्तम गुणीं शृंघारला । ज्ञानवैराग्यें शोभला ।
तोची येक जाणावा भला । भूमंडळीं ॥ १७ ॥
स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोसित जावें ।
झिजोन कीर्तीस उरवावें । नाना प्रकारें ॥ १८ ॥
कीर्ती पाहों जातां सुख नाहीं । सुख पाहातां कीर्ती नाहीं ।
विचारेंविण कोठेंचि नाहीं । सामाधान ॥ १९ ॥
परांतरास न लावावा ढका । कदापि पडों नेदावा चुका ।
क्षमासीळ तयाच्या तुका । हानी नाहीं ॥ २० ॥
आपलें अथवा परावें । कार्य अवघेंच करावें ।
प्रसंगीं कामास चुकवावें । हें विहित नव्हे ॥ २१ ॥
बरें बोलतां सुख वाटतें । हें तों प्रत्यक्ष कळतें ।
आत्मवत परावें तें । मानीत जावें ॥ २२ ॥
कठिण शब्दें वाईट वाटतें । तें तों प्रत्ययास येतें ।
तरी मग वाईट बोलावें तें । काये निमित्य ॥ २३ ॥
आपणास चिमोट घेतला । तेणें कासाविस जाला ।
आपणावरून दुसऱ्याला । राखत जावें ॥ २४ ॥
जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी ।

आपणास घात करी । कोणियेके प्रसंगीं ॥ २५॥
पेरिलें ते उगवतें । बोलण्यासारिखें उत्तर येतें ।
तरी मग कर्कश बोलावें तें । काये निमित्य ॥ २६॥
आपल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ।
परंतु कष्टी करावें । हे राक्षेसी क्रिया ॥ २७॥
दंभ दर्प अभिमान । क्रोध आणी कठिण वचन ।
हें अज्ञानाचें लक्षण । भगवद्गीतेंत बोलिलें ॥ २८॥
जो उत्तम गुणें शोभला । तोचि पुरुष माहा भला ।
कित्येक लोक तयाला । शोधीत फिरती ॥ २९॥
क्रियेविण शब्दज्ञान । तेंचि स्वानाचें वमन ।
भले तेथें अवलोकन । कदापी न करिती ॥ ३०॥
मनापासून भक्ति करणें । उत्तम गुण अगत्य धरणें ।
तया माहांपुरुषाकारणें । धुंडीत येती ॥ ३१॥
ऐसा जो माहानुभाव । तेणें करावा समुदाव ।
भक्तियोगें देवाधिदेव । आपुला करावा ॥ ३२॥
आपण आवचितें मरोन जावें । मग भजन कोणें करावें ।
याकारणें भजनास लावावे । बहुत लोक ॥ ३३॥
आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी ।
आपणामागें जगदीशासी । भजत जावें ॥ ३४॥
याकारणें समुदाव । जाला पाहिजे मोहोछाव ।
हातोहातीं देवाधिदेव । वोळेसा करावा ॥ ३५॥
आता समुदायाकारणें । पाहिजेती दोनी लक्षणें ।
श्रोतीं येथें सावधपणें । मन घालावें ॥ ३६॥
जेणें बहुतांस घडे भक्ति । ते हे रोकडी प्रबोधशक्ति ।
बहुतांचें मनोगत हातीं । घेतलें पाहिजे ॥ ३७॥
मागा बोलिले उत्तम गुण । तयास मानिती प्रमाण ।
प्रबोधशक्तीचें लक्षण । पुढें चाले ॥ ३८॥
बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें ।
तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥ ३९॥
जें जें जनास मानेना । तें तें जनहि मानीना ।
आपण येकला जन नाना । सृष्टिमधें ॥ ४०॥
म्हणोन सांगाती असावे । मानत मानत शिकवावे ।
हळु हळु सेवटा न्यावे । विवेकानें ॥ ४१॥
परंतु हे विवेकाचीं कामें । विवेकी करील नेमें ।
इतर ते बापुडे भ्रमें । भांडोंच लागले ॥ ४२॥
बहुतांसीं भांडतां येकला । शैन्यावांचून पुरवला ।
याकारणें बहुतांला । राजी राखावें ॥ ४३॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
उत्तमपुरुषनिरूपणनाम समास दहावा ॥ १०॥ १२.१०
॥ दशक बरावा समाप्त ॥

Encoded and proofread by Vishwas Bhide.
Reproofread by P. D. Kulkarni